''एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची बालकांच्या सामाजिकरणातील भूमिका''
विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

संशोधक

पंदिलवाड अनुसया माणिकराव

एम.ए., बी.एड., सेट, एम.फिल. (समाजशास्त्र)

Category - NT-1 (B)

Email- anudubukwad@gmail.com

मार्गदर्शक

डॉ.सुरेश विठ्ठलराव धनवडे

समाजशास्त्र विभागप्रमुख

ए.सी.एस. कॉलेज शंकरनगर ता.बिलोली जि.नांदेड

Email-sureshdhanwade@gmail.com

मे 2019

प्रस्तावना :

कोणत्याही देशाचा विकास त्या देशातील लोकसंख्येवर अवलंबून असतो. कारण लोकसंख्या ही देश विकासाचे साधन आहे. देशाची लोकसंख्या जितकी महत्त्वाची आहे तितकीच ती गुणात्मकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. तसेच देशातील लोकांचे आरोग्य, शिक्षण, आयुर्मान, लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन या बाबीदेखील महत्त्वपूर्ण आहेत.

प्रत्येक देश आपल्या देशातील लोकसंख्या किती आहे याचा अंदाज घेण्यासाठी दहा हजार वर्षांनी जनगणना करतो. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची वयोगटानुसार लोकसंख्या पुढीलप्रमाणे नमूद करता येईल.

"2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 21,05,69,573 इतकी असून त्यातील पुरूषांची एकूण लोकसंख्या 623121843 इतकी तर स्त्रियांची एकूण लोकसंख्या 587447730 इतकी आहे. तर 0-6 वर्षे वयोगटातील बालकांची एकूण लोकसंख्या 164478150 तर त्यातील पुरूष बालक संख्या 85732470 इतकी तर बालिकांची एकूण संख्या 78745680 इतकी आहे."[1]

तर 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 112374333 इतकी तर त्यातील पुरूषांची एकूण लोकसंख्या 58243056 इतकी तर स्त्रियांची एकूण संख्या 54131277 इतकी आहे. 0-6 वर्षे वयोगटातील बालकांची एकूण लोकसंख्या 13326517 इतकी असून पुरूष बालकांची एकूण संख्या 7035391 इतकी आणि बालिकांची एकूण संख्या 6291126 इतकी आहे.

2011 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 3361292 इतकी आहे. त्यातील पुरूषांची एकूण लोकसंख्या 1730075 इतकी तर स्त्रियांची एकूण संख्या 1631217 तर 0-6 वर्षे वयोगटातील बालकांची एकूण लोकसंख्या 459572 इतकी असून त्यातील पुरूष बालकांची एकूण लोकसंख्या 240620 इतकी तर बालिकांची एकूण लोकसंख्या 218952 इतकी आहे."

बालक हे देशाचे आधारस्तंभ आहेत. 3 ते 6 वर्षे वयोगटाचा कालखंड बालकाच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतो. कारण याच वयात त्याचा बौद्धिक आणि मानसिक विकास तीव्र गतीने होतो. या संवेदनशील वयात त्याचे अनुभव विश्व जितके समृद्ध केले जाईल तेवढी त्याच्या उपजत गुणाच्या विकासाला चालना मिळेल. शिक्षण हे व्यक्तीविकासाचे साधन आहे. शिक्षणामुळे मानवी जीवन समृद्ध व संपन्न होते त्यात बालशिक्षणाचे कार्य तर पायाभूत स्वरूपाचे आहे दुर्देवाने बालशिक्षणाकडे समाजाचे दुर्लक्ष झालेले दिसत आहे. मागासलेल्या झोपडपट्टीत ग्रामीण आदिवासी भागात बालकाच्या सर्वांगिण विकासाकडे पाहिजे तसे लक्ष दिल्या जात नाही. ज्या वयात बालकाच्या व्यक्तिमत्व विकासाचा टप्पा सुरू होतो. अशाच वेळी कळत न कळत परिस्थितीमुळे बालकांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. यातून बालकासंबंधी अनेक समस्या निर्माण होतात, तसेच सामाजिककरणाचा प्रश्न निर्माण होतो.

प्राचीन कालखंडापासून ते आजच्या जागतिकीकरणाच्या युगात देखील बालकाच्या सामाजिकरणाची जबाबादाीर कुटूंबसंस्था, शाळा यांच्यामार्फत केल्या जात होती. परंतु नव्यानेच सामाजिकरणाची जबाबदारी अंगणवाडी, बालवाडी यांच्यामार्फत पार पाडताना दिसून येते. म्हणून अंगणवाडी सेविकांची बालकाच्या सामाजिकरणातील भूमिका कशी आहे याचा अभ्यास मी या संशोधनातून करणार आहे. बालकाविषयी पंडित जवाहरलाल नेहरू असे म्हणतात की, "बालके हा केवळ राष्ट्राचा ठेवा न मानता देशाभिमानाची ढापणे लावून तुकडे पाडलेल्या या जगाला एकत्र ठेवणारी शक्ती आहे."[2]

सामाजिकरणाची संकल्पना :

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजात राहूनच मानवाचे सामाजिक आंतरक्रियेद्वारे व्यक्तिमत्व विकसित होते. मानवी अर्भक जन्मतः एक हाडा मासाचा गोळा असते. परंतु अर्भक जन्मतः मानवी जैविक गुणधर्म घेऊन जन्माला येते. त्या जैविक गुणधर्माचा वापर समाजमान्य पद्धतीने करण्यास समाज प्रयत्न करीत असते. जैविक गुणधर्मामुळेच मानवाचे सामाजिकरण करणे सोपे जाते आणि ते करणे तितकेच महत्वाचे आहे.

मानव आणि मानवेत्तर प्राण्यांच्या तूलनेत मानवाचा परावलंबनाचा कालखंड दीर्घ स्वरूपाचा आहे. अनेक बाबतीत मानवी अर्भकाला इतरांवर अवलंबून राहावे लागते. जन्मल्यानंतर मानवी अर्भकाच्या सर्व गरजा आई-वडिलांकडून पूर्ण करून घेतल्या जातात. जसे दुध, पाणी, जेवण, बालकाला भरवावे लागते. या वयात मलमुत्र विसर्जनावर बालकाचा ताबा नसतो. म्हणजे एक प्राणी म्हणून बालकाचे शारीरिक अस्तित्व जास्त काळ इतरावर अवलंबून असते.

सामाजिकरणामुळे मानवाला समाजात एक दर्जा प्राप्त होतो. तसेच त्याला संस्कृती आत्मसात करता येते. सामाजिकरण हे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिकरणाशिवाय व्यक्तिचे व्यक्तिमत्व आणि समाजाची समाजशीलता मिळत नाही. मानवेत्तर प्राण्यांना सहजप्रवृत्तीचे वरदान मिळालेले असते. तर मानव प्राण्यात सहज प्रवृत्तीचा अभाव असतो. परंतु सुप्त जैविक क्षमता केवळ मानवी प्राण्यातच असल्यामुळे मानव प्राण्याचे सामाजिकरण करणे शक्य होते.

सामाजिकरणासंदर्भात ॲरिस्टॉटल असे म्हणतो "मनुष्य समाजप्रिय प्राणी आहे. मनुष्य सामाजिकरणाच्या प्रक्रियेशिवाय समाजशील बनूच शकत नाही. तो इतर प्राण्यासारखा एक प्राणी आहे. पण उच्च बुद्धिमत्ता व विचारशक्तीचे सामर्थ्य जास्त असल्याने व सामाजिकरणाच्या प्रक्रियेमुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते नसता तो एक पशुवत प्राणी राहिला असता."[3]

म्हणजेच मनुष्य जन्मतः सामाजिक नसतो तर सामाजिकरण प्रक्रियेद्वारे त्याला समाजशीलता प्राप्त होते. मानवाच्या जीवनात सामाजिकरणाला अत्यंत महत्त्व आहे. सामाजिकरणापासून दूर राहणाऱ्या मानवी अर्भकाची काय अवस्था होईल याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

1) 1920 साली रेव्हरंड जे.सिंग यांना बंगालमध्ये लांडग्याच्या गुहेत व लांडग्याच्या सहवासात वाढलेल्या दोन मुली एक कमला व दुसरी अमला या दोन मुली होत त्यांना मनुष्याप्रमाणे संवेदना नव्हती माणसाप्रमाणे खाणे-पिणे, बोलणे-चालणे त्यांना येत नव्हते ज्याप्रमाणे लांडग्यांचा दिनरात क्रम जीवनपद्धती होती त्याप्रमाणे त्या वागत.

अमला लवकरच वारली, कमला मात्र सिंग कुटुंबाच्या सहवासात सतरा वर्षे जिवंत राहिली. तिच्या भिती, राग, आनंद यासारख्या भावनांचा विकास झाला. तिला काही शब्द बोलता येऊ लागले.

2) कमला, अमला प्रमाणे इसाबेल नावाची मुलगी एका अंधाऱ्या खोलीत तिच्या मुक्या व बहिऱ्या आईसोबत साडे-सहा वर्षे राहिली या काळात तिला प्रेम जिव्हाळा मिळाला नाही शिक्षणापासून वंचित राहिली परिणामी ही मुलगी मंद बुद्धीची दिसून आली. "[4]

जन्मत: मानवी अर्भकाला जैविक गुणधर्म मिळाले असले तरी सहजासहजी मानवत्व प्राप्त होत नाही. मानवी बालकाचा इतरांशी संपर्क येऊन त्यांच्यात आंतरक्रिया झाल्या तरच बालकाच्या क्षमतांचा विकास होतो. त्याचे व्यक्तिमत्व विकसित होते आणि समाजात राहण्यास पात्र ठरते. हे वरील दोन्ही उदाहरणावरून दिसून येते.

सामाजिकरणाची व्याख्या :

"समाजाचा सभासद म्हणून कार्यरत राहण्यासाठी आवश्यक असलेली बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक कौशल्ये मूल ज्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या सामाजिक आंतरक्रियात्मक प्रक्रियांत शिकते त्याला सामाजिकरण असे म्हणतात."

- टिशेलर, व्हॉयटन आणि हंटर.

"सामाजिक भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य शिकणाऱ्याला प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे सामाजिकरण होय. सामाजिकरणात संस्कृती शिकून घेतली जाते." - **हॅरी जॉन्सन**

"सामाजिकरणामुळे सजीव प्राण्यांचे सामाजिक मानवात रूपांतर होते. "

- हॉब्ज आणि ब्लॅक

वरील व्याख्येवरून असे लक्षात येते की, सामाजिकरण ही एक अध्ययन प्रक्रिया असून त्या प्रक्रियेद्वारे मानवाचा सर्वांगीण विकास होतो तसेच व्यक्ती अनेक कौशल्य शिकत असते."[5]

संशोधनाचे महत्त्व :

"संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परीक्षण होय."[6] अशी वेस्टरच्या शब्दकोषानुसार व्याख्या करण्यात आली.

बालक हे दशाचे भविष्य आहे. शासन बालकाच्या विकासासाठी देशात अनेक योजना पंचवार्षिक योजनेद्वारे राबवित असते. त्यातील एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे एकात्मिक बाल विकास सेवा योजना होय. ही केंद्रशासन पुरस्कृत योजना असून राज्यशासन राबवित असते. या योजनेचे लाभधारक अनेक घटक असून त्यातील बालकाच्या विकासासाठी ही योजना किती महत्त्वपूर्ण आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेद्वारे अंगणवाडी मार्फत वेगवेगळ्या उपक्रमातून बालकाचा शारीरिक, मानसिक, सामाजिक, भाषिक, भावनिक विकास घडवून आणण्याचे कार्य अंगणवाडी सेविका करीत असते. बालकाचा तीन ते सहा वर्षे कालखंड अतिशय महत्त्वपूर्ण असतो याच वयात अंगणवाडी सेविका सामाजिक आंतरक्रियेद्वारे सामाजिकरण करीत असते. या वयात बालकाचे योग्य सामाजिकरण झाले तर भविष्यातील डॉक्टर, इंजिनिअर, वकील, लेखक यातून देशाला मिळतील म्हणून या वयात योग्य सामाजिकरण होणे आवश्यक आहे. म्हणून बालकाच्या सामाजिकरणात अंगणवाडी सेविकेची भूमिका कशी आहे हेच या संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधन विषयाचे अध्ययन क्षेत्र :

"सामाजिक संशोधनाच्या अध्ययनाची व्याप्ती संपूर्ण सामाजिक आणि त्यासंबंधीत सामाजिक प्रक्रिया आणि नियमापर्यंत व्यापक आहे. परंतु संशोधकाच्या संशोधनास एक योग्य दिशा मिळावी अधिक वस्तूनिष्ठ अध्ययन व्हावे यासाठी संशोधनाचे क्षेत्र व व्याप्ती ठरवणे आवश्यक असते."[7]

सदरील अध्ययनासाठी नांदेड जिल्हा हे अभ्यासाचे क्षेत्र आहे. नांदेड जिल्ह्यातील एकूण सोळा तालुक्यापैकी सहेतूक नमुना निवड पद्धतीने कंधार, लोहा, मुखेड, नायगाव या चार तालुक्यातील व ग्रामीण अंगणवाडीतील अंगणवाडी सेविकेच्या भूमिकेचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाचा विषय :

"एखाद्या विषयाला जाणून घेण्याची उत्सुकता हाच संशोधनाच्या विषयाच्या निवडीचा प्रारंभिक मुद्दा मानला जातो. या संदर्भात आर.एल.एकोफ म्हणतात संशोधन समस्येचे योग्य प्रकारे निर्धारण हीच संशोधनाची अर्धी यशस्वीता आहे."[8]

सामाजिक संशोधनातील पहिला टप्पा म्हणजे समस्या सुत्रण होय. या टप्प्यात संशोधकाला समस्यासूत्रण करताना अध्ययनाच्या कोणत्या घटकाला महत्व द्यायचे हे ठरवावे लागते. तसेच संशोधनामध्ये संशोधन विषयाची निवड केल्याशिवाय संशोधन कार्य पुढे जाऊ शकत नाही. म्हणून संशोधकाने "एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची बालकाच्या सामाजिकरणातील भूमिका" संदर्भ नांदेड जिल्हा या संशोधन विषयाची निवड केलेली आहे. या संशोधनात अंगणवाडी सेविका वेगवेगळ्या उपक्रमातून बालकाचा सामाजिक, भाषिक, बौद्धिक, मानसिक, भावनिक विकास घडून आणते. याचा अभ्यास संशोधनातून करणार आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :

1) बालकाच्या सामाजिक विकासाचा अभ्यास करणे
2) बालकाच्या बौद्धिक विकासाचा अभ्यास करणे.
3) बालकाच्या भावनिक, मानसिक, शारीरिक विकासाचा अभ्यास करणे.
4) बालकाच्या सामाजिकरणात अंगणवाडी सेविकेची भूमिका कशी आहे हे अभ्यासणे.
5) अंगणवाडीद्वारे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाचा अभ्यास करणे.
6) अंगणवाडी संदर्भात बालकाच्या पालकांची मानसिकता अभ्यासणे.
7) अंगणवाडी सेविकेच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
8) आय.सी.डी.एस. योजनेचा लाभ प्रत्येक बालक घेते का ? हे अभ्यासणे.

संशोधन गृहीतके :

1) बालकाच्या सामाजिकरणात अंगणवाडी सेविकेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.
2) अंगणवाडीला शासनाकडून मिळणारे शैक्षणिक साहित्य आधुनिक पद्धतीचे मिळत नाही.

3) अंगणवाडी सेविका उच्च शिक्षित नाहीत.

4) अंगणवाडीला भौतिक साधनांचा अपूरा पूरवठा होतो.

5) अंगणवाड्या सुरक्षित ठिकाणी नाहीत.

6) अंगणवाड्या डिजिटल स्वरूपाच्या नाहीत.

7) अंगणवाडीतील बालकांसाठी शौचालयाची सुविधा नाही.

8) अंगणवाड्या आय.एस.ओ. मानांकन प्राप्त नाहीत.

9) अंगणवाडी सेविकेला कामाचा योग्य मोबदला मिळत नाही.

10) अंगणवाडीला शासनाकडून मिळणारा पुरक पोषण आहार दर्जेदार मिळत नाही.

संशोधनाचा आराखडा :

सामाजिक संशोधनातील एक महत्त्वाची पायरी म्हणून संशोधन आराखडा ओळखला जातो. आराखडा तयार करणे म्हणजे कार्ययोजना आखणे होय. "संशोधन कार्यास सुरूवात करण्याअगोदर सर्वप्रथम संशोधन आराखडा तयार करावा लागतो. त्या आराखड्यात संशोधनाचा उद्देश, संशोधनाचे क्षेत्र, कालावधी, आवश्यक सामग्री, नमुना निवडीचे आधार कोणते, माहिती मिळविण्याचे साधने माहितीचे विश्लेषण, तंत्रसाधनांचा वापर करून नियोजनबद्ध सुरूवात केली तर संशोधनाची उद्दिष्टे हाती लागू शकतात. "[9]

संशोधन आराखड्याशिवाय वस्तूनिष्ठ संशोधन करणे अशक्य आहे. संशोधन आराखड्यामुळे श्रम, वेळ, पैसा यांची बचत होते. सी.सेल्टीज, एम.जोहडा, एम.डवॉईश आणि एस.कुक यांच्या मते "निष्कर्षाची संशोधन उद्दिष्ट्ये संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता यांची सांगड घालता येईल अशा प्रकारे तथ्यांचे संकलन व विश्लेषण करता यावे यासाठी आवश्यक अशा अटींची नियोजित व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय."[10]

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आराखडा प्रमाण मानण्यात आला आहे. त्यामुळे सदरील संशोधनामध्ये वर्णनात्मक आराखड्याचा संशोधनासाठी उपयोग केला जाणार आहे.

"वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समुह, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. "[11]

म्हणून संशोधकांनी बालकाच्या सामाजिकरणात अंगणवाडी सेविकांची भूमिका अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करणार आहे.

नमुना निवड पद्धती :

सामाजिक संशोधनात नमूना निवड पद्धतीचा उपयोग केला जातो. नमूना म्हणजे "एका पूर्व निर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समूहामधून एक निश्चित प्रतिशत निवडणे होय."[12] अशी बोगार्डसने व्याख्या केली. प्रस्तुत संशोधनासाठी गैर संभाव्यता नमूना निवड प्रकारातील सहेतूक नमूना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

"ज्यावेळी संशोधक एखादा विशिष्ट हेतू किंवा उद्देश समोर ठेवून काही एककांची निवड करतो त्यावेळी त्या नमूना निवड पद्धतीला सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमूना निवड पद्धती असे म्हणतात."[13]

प्रस्तूत अध्ययनासाठी गैर संभाव्यता नमूना निवड पद्धती अंतर्गत सहेतूक पद्धतीचा वापर करून 300 नमूना घटकांची निवड केली जाणार असून नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यापैकी चार तालूक्यांची, तालुका व ग्रामीण भागातून 75 नमुना घटकांची निवड केली जाणार आहे.

तथ्य संकलनाच्या पद्धती :

तथ्य संकलन हे वैज्ञानिक पद्धतीची महत्त्वाची एक पायरी आहे. संशोधन करीत असताना संशोधकाला तथ्य किंवा माहिती गोळा करावी लागते. "तथ्य एक अनुभवसिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे. "[14] अशी तथ्यांची व्याख्या गुड आणि हॅट यांनी केली आहे.

तथ्य संकलनाचे दोन प्रकार आहेत. प्राथमिक तथ्य संकलन आणि द्वितीय तथ्य संकलन संशोधक तथ्य संकलन करीत असताना दोन्ही स्त्रोतांचा वापर करतो. प्राथमिक तथ्य संकलनाच्या प्रकारात संशोधकाला आपल्या विषयाची माहिती प्रत्यक्ष जाऊन मिळवावी लागते तर द्वितीय तथ्य संकलनाच्या प्रकारात इतरांनी गोळा केलेल्या माहितीचा उपयोग संशोधक स्वतःच्या संशोधनासाठी करीत असतो. दोन्ही स्त्रोताद्वारे मिळविलेली तथ्य अस्ताव्यस्त व विखूरलेली असतात त्यांना योग्य तो क्रम देऊन वस्तूनिष्ठ व अनुभवनिष्ठ मांडणी करून विश्लेषण करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोतातील मुलाखत

अनुसूची या प्राथमिक स्त्रोताचा वापर केला जाईल. तर द्वितीयक स्त्रोतामध्ये मासिके, अहवाल, पुस्तके, संशोधने, वेबसाईड वर्तमान पत्र महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयातून माहिती संकलित केली जाईल.

तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

सामाजिक संशोधनात तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचनाला अत्यंत महत्त्व आहे. वेगवेगळ्या स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या माहितीला शास्त्रीय रूप देण्यासाठी विश्लेषण करावे लागते. जोपर्यंत संशोधक संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करीत नाही तोपर्यंत कच्च्या स्वरूपातील तथ्य अर्थहीन राहतात. विश्लेषण आणि निर्वचनामुळे तथ्याला एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. म्हणजेच तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

"एखाद्या संमिश्र व गुंतागुंतीच्या घटनेचे स्पष्टीकरण करताना अत्यंत तार्किक पद्धतीने त्यात समाविष्ट असलेले निरनिराळे घटक वेगळे करून सांगणे म्हणजे तथ्यांचे विश्लेषण करणे होय. "[15]

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनानंतर संकलित केलेल्या माहितीवरून निष्कर्ष काढावे लागते. तसेच तथ्यांचे सांकेतिकरण करणे गरजेचे असते. त्याशिवाय तथ्यांचे विश्लेषण करणे सोपे जात नाही. प्राप्त सांकेतिकरण झालेली माहिती वेगवेगळ्या स्तंभ किंवा उभ्या आडव्या ओळीत विशेष गुणधर्मानुसार योग्य रितीने मांडणे म्हणजे सारणीयन होय. तथ्यांच्या आधारावर अनेक सारण्या किंवा स्तंभ तयार होतात. त्याला योग्य क्रमांक शीर्षक किंवा उपशीर्षक देणे आवश्यक असते. सारणीमध्ये प्राप्त झालेल्या विशिष्ट प्रतिसादाचे गुणोत्तर शेकडेवाडी प्रमाण सांख्यिकिय पद्धतीचा वापर करून घटकांचे प्रमाण शेकडेवारीमध्ये मांडले जाईल.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

सदरील संशोधन "एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची बालकाच्या सामाजिकरणातील भूमिका-संदर्भ नांदेड जिल्हा या अभ्यास विषयापुरते मर्यादित असेल. अध्ययनासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली. संशोधन हे नांदेड

जिल्ह्यापुरते मर्यादित राहील. यात अंगणवाडी सेविकेची वैयक्तिक माहिती, बालकाच्या सामाजिकरणात अंगणवाडी सेविकेची भूमिका, अंगणवाडीतील बालकांसाठी घेतलेले उपक्रम इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाईल आणि निष्कर्ष काढले जातील.

प्रकरणीकरण योजना

प्रकरण 1 ले : प्रस्तावना व ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण 2 रे : संशोधन पद्धती

प्रकरण 3 रे : संबंधित संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण 4 थे : अंगणवाडीतील राबविले जाणारे उपक्रम

प्रकरण 5 वे : अंगणवाडी सेविकेची आर्थिक, सामाजिक परिस्थिती

प्रकरण 6 वे : अंगणवाडी सेविकाकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण

प्रकरण 7 वे : निष्कर्ष व शिफारशी

संशोधक

पंदिलवाड अनुसया माणिकराव

एम.ए., बी.एड., सेट, एम.फिल.

(समाजशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.सुरेश विठ्ठलराव धनवडे

समाजशास्त्र विभागप्रमुख

ए.सी.एस. कॉलेज शंकरनगर ता.बिलोली

जि.नांदेड

संदर्भ ग्रंथ :

1) सवदी ए.बी. (एप्रिल 2015) भूगोल व पर्यावरण, निराली प्रकाशन, पुणे, पृ.5.5

2) सचदेव डी.आर. (जानेवारी 2010) भारतातील समाजकल्याण व समाजकल्याण प्रशासन, के सागर पब्लिकेशन पुणे, पृ.339.

3) वाघ राम (जून 1994) समाजशास्त्राची मूलतत्त्वे, न्यू रचना प्रकाशन, लातूर, पृ.168.

4) कित्ताः पृ.169.

5) सर्जेराव साळूंखे (2006), समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे, पृ.160.

6) कुऱ्हाडे बी.एम., (जून 2011) शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं.पब्लिशर्स नागपूर, पृ.12.

7) पाटील वा.भा. (2010), संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, पृ.11.

8) काऱ्हाडे बी.एम., (जून 2011), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, पृ.18.

9) कित्ताः पृ.138.

10) भांडारकर पु.ल. (1997), सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, पृ.126.

11) कऱ्हाडे बी.एम., (जून 2011), शास्त्रीय संशोधन पद्धती पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ.156.

12) कित्ता, पृ.168.

13) कित्ता, पृ.193.

14) कित्ता, पृ.205.

15) कित्ता, पृ.450.